ePaper

## 'डीएमके'नं लुटलेले जनतेचे पैसे मी परत करणार; मोदींची तमिळ जनतेला गॅरंटी



| वर्ष - 7 । अंक - 288 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- धोनी लवकरच नव्या भूमिकेत
- साराची सर्वोत्कृष्ट भूमिका?
- शेतकरी दिल्लीत घुसणार?
- नायकाला म्हणावं दाढी खाजव

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 5 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मावळवर पुन्हा भगवा!

## उद्धव ठाकरे : मावळ लोकसभेसाठी संजोग वाघेरेची उमेदवारी जाहीर

। पिंपरी । महाईन्यूज

**मावळ लोकसभेवर पुन्हा भगवा फडकाविण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी मावळ लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यावर असताना पनवेल येथील सभेत संजोग वाघेरे यांना उमेदवारी जाहीर केली. शिवसेना पक्ष आणि पक्ष चिन्ह शिंदे गटाला गेल्यानंतर ही पहिलीच निवडणूक असणार आहे. यावेळी ठाकरे यांनी मावळ मतदार संघावर पुन्हा भगवा फडकवण्याची घोषणा केली.**



### संजोग वाघेरे यांच्या रूपात तगडे आव्हान

मावळ लोकसभेतील मतदार सुरुवातीपासूनच ठाकरे घराण्याची विचाराशी ठाम राहिले आहेत. या मतदारसंघात शिवसेनेचे मोठे वलय आहे. राज्यात राजकीय सत्ता नाट्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या सोबतीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार, राष्ट्रीय काँग्रेस, शेकाप अशा विविध पक्षांचा पाठिंबा मिळणार आहे. २००९ साली घाटाखालील तीन पनवेल, कर्जत- खालापूर व उरण तीन विधानसभा आणि घटावरती पिंपरी, चिंचवड व मावळ तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. २००९ साली मावळ लोकसभा मतदारसंघ निर्माण झाला तेव्हापासून शिवसेनेचा भगव्याने हॅट्रिक केली आहे. आता महायुती विरोधात महायुतीकडून संजोग वाघेरे यांच्या रूपात तगडे आव्हान उभे करून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मावळ वरती पुन्हा भगवा फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

सोमवार दिनांक 4 मार्च रोजी उद्धव ठाकरे यांची मावळ लोकसभा मतदारसंघात पनवेल, खोपोली, उरण या तीन ठिकाणी सभा घेतल्या. सुरुवातीला हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजचे उद्घाटन केल्यानंतर पनवेल येथे सभा घेण्यात आली. यावेळी पिंपरी चिंचवडचे माजी महापौर संजोग वाघेरे यांची उमेदवारी घोषित करून मावळ मतदार संघावर पुन्हा भगवा फडकवणार असे म्हटले आहे.

मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत आहेत. मावळ लोकसभा स्थापनेपासून शिवसेनेचा सलग 15 वर्ष खासदार निवडून येत आहे. आता शिवसेनेचे दोन भागात विभागणी झाल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाने मावळ लोकसभेवर पुन्हा भगवा फडकवण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून आलेले माजी महापौर संजोग वाघेरे त्यांना शिवसेना ठाकरे गटाकडून या लोकसभा मतदारसंघात उमेदवारी जाहीर करत कामाला लागण्याचे आदेश पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज तमाम शिवसैनिकांना दिले आहेत.

---

## '1 बूथ 10 युथ' संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात बैठक उत्साहात

### राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मावळ लोकसभा व शिरूर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पिंपरी येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष कार्यालयामध्ये सर्व पदाधिकारी, सर्व विधानसभा अध्यक्ष, विविध सेलचे अध्यक्ष पदाधिकारी, सेवा दल पदाधिकारी, बूथ कमिटी सदस्य तसेच कार्यकर्ते यांची '1 बूथ 10 युथ' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात बैठक उत्साहात पार पडली, अशी माहिती राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी दिली.

यावेळी आयोजित बैठकीमध्ये उपस्थित सर्व पदाधिकारी, बूथ कमिटी प्रमुख, सदस्य यांना प्रत्येक बूथ संदर्भात कार्यपद्धती कशी राबवावी, यासाठी नियोजनबद्ध मार्गदर्शन केले. पदाधिकारी व बूथ कमिटी सदस्यांच्या समस्या जाणून घेतल्या, व त्यावर उपाययोजना सुचविल्या.

#### नियोजनबद्ध कामाचा निर्धार

उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा उत्साह पाहता



मावळ लोकसभा मतदारसंघ, तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पिंपरी-चिंचवडच्यावतीने नियोजनबद्ध काम होईल, तसेच आपलाच उमेदवार विजयी होईल, असा विश्वास व निर्धार सर्वांनी व्यक्त केला.

# डॉ. कोल्हेंना उमेदवारी देण्यात चूक!

## » दोन वर्षातच अमोल कोल्हे कंटाळले : अजित पवार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पहिल्या दोन वर्षातच खासदार अमोल कोल्हे कंटाळले होते. राजीनामा देण्याचे ते बोलत होते. यात चूक आमचीच आहे. विकासकामे करण्याची आवड आहे की नाही, हे पहायला हवे होते. कोल्हे यांना उमेदवारी देऊन, त्यांचा प्रचार करून आमचीही चूक झाली आहे, असे राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे सांगितले.**



अजित पवार यांनी सोमवारी शिरूरमध्ये शेतकरी मेळावा घेतला. या मेळाव्याच्या माध्यमातून त्यांनी कोल्हे यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, वक्तृत्व चांगले आहे. दिसायलाही रुबाबदार आहे. पुढे काही तरी चांगले काम करतील, असे वाटल्यानेच अन्य पक्षाचे असतानाही त्यांना उमेदवारी दिली. मात्र ते दोन वर्षातच कंटाळले. निवडून आल्यानंतर दोन वर्षातच कोल्हे यांनी राजीनामा देण्याची भाषा सुरू केली. जनतेने पाच वर्षांसाठी निवडून दिले आहे. त्यामुळे दोन वर्षांत राजीनामा देणे योग्य नाही, असे मी त्यांना सांगितले. मात्र कलावंत असल्याने त्याचा व्यावसायावर परिणाम होत आहे. सेलिब्रेटी असल्याने रोज मतदारसंघात येणे शक्य नाही, असे कोल्हे यांनी सांगितले. कोल्हे यांना तुम्हीच पक्षात घेतले आहे, तुम्हीच त्यांची समजूत काढा, असे पक्षाचे नेते मला सांगत होते. कोणाच्या डोक्यात काय आहे, हेच कळायला मार्ग नव्हता. राजकारण हा त्यांचा पिंड नाही. एखाद्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी हेमा मालिनी, धर्मेंद्र, गोविंदा, सनी देओल निवडणुकीला उभे रहातात. लोक त्यांच्याकडे पाहून मतदान करताना. मात्र त्यांचा राजकारणाशी काय संबंध नाही. विकासकामे करण्याची आवड आहे की नाही, हे पहायला हवे होते. ती चूक झाली, असे पवार यांनी सांगितले.शरद पवार यांनी मला निवडणुकीची संधी दिली. कलावंताला उमेदवारी देणे ही चूक होती, असे पवार म्हणत आहेत. त्यांनी काही कलावंतांचीही उदाहरणे दिली. मात्र त्यांनी दिलेल्या एकाही खासदाराला संसदरत्न पुरस्कार मिळाला नाही. शिरूर लोकसभा मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न मांडताना मला तीन वेळा संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे. खासगीत झालेल्या गोष्टी जाहीर नकरण्याचा राजकारणातील अलिखीत नियम आहे. तो मी नेहमीच पाळतो. मात्र सातत्याने आरोप करत असाल तर आणि माझ्यासारख्या कलावंताला उमेदवारी देणे चूक असेल तर दहा-दहा वेळा माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला तुमच्या पक्षात येण्यासाठी निरोप का पाठविण्यात आले. लपून-छपून भेटीगाठी करण्याचे कोणते कारण होते, असा सवाल खासदार कोल्हे यांनी केला.यांचा विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पराभव केला होता. शिवसेनेतील फुटीनंतर आढळराव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला. त्यामुळे आढळराव पाटील आणि कोल्हे यांच्या लढत होईल, अशी चर्चा असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर राजकीय समीकरणे बदलली. अजित पवार यांनीही शिरूर लोकसभेची जागा निवडून आणण्याचा चंग बांधल्याने त्यांचा उमेदवार कोण असेल, अशी चर्चा सुरू झाली असतानाच आढळराव यांना म्हाडाचे अध्यक्षपद देण्यात आले.

### दोन वर्षांत राजीनामा देणे योग्य नाही

» अजित पवार यांनी सोमवारी शिरूरमध्ये शेतकरी मेळावा घेतला. या मेळाव्याच्या माध्यमातून त्यांनी कोल्हे यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, वक्तृत्व चांगले आहे. दिसायलाही रुबाबदार आहे. पुढे काही तरी चांगले काम करतील, असे वाटल्यानेच अन्य पक्षाचे असतानाही त्यांना उमेदवारी दिली. मात्र ते दोन वर्षातच कंटाळले. निवडून आल्यानंतर दोन वर्षांतच कोल्हे यांनी राजीनामा देण्याची भाषा सुरू केली. जनतेने पाच वर्षांसाठी निवडून दिले आहे. त्यामुळे दोन वर्षांत राजीनामा देणे योग्य नाही, असे मी त्यांना सांगितले. मात्र कलावंत असल्याने त्याचा व्यावसायावर परिणाम होत आहे. सेलिब्रेटी असल्याने रोज मतदारसंघात येणे शक्य नाही.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे सुलभपणे उपलब्ध

## » ऑनलाइन अर्ज भरून विद्यार्थ्यांना घरबसल्या कागदपत्रे मिळणार

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये, संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना त्यांची शैक्षणिक कागदपत्रे आता सुलभपणे उपलब्ध होणार आहेत. विद्यापीठ आता कागदविरहित प्रक्रियेकडे जात असून, ऑनलाइन अर्ज भरून विद्यार्थ्यांना घरबसल्या कागदपत्रे मिळणार आहेत.**



विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडून (स्टुडंट फॅसिलिटेशन सेंटर) विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे दिली जातात. त्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून, त्याची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठात सादर करावी लागते. या प्रक्रियेत बराच वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होते. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया केवळ ऑनलाइन पद्धतीने राबवण्याची मागणी विद्यार्थी संघटनांकडून करण्यात येत होती. तसेच अधिसभा सदस्यांनीही त्याबाबतची मागणी केली होती. त्यानंतर विद्यापीठाने नेमलेल्या परीक्षासुधार समितीच्या माध्यमातून आता ही प्रक्रिया पूर्ण ऑनलाइन आणि कागदविरहित करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांना ट्रान्स्क्रिप्टसाठी ऑनलाइन सुविधा देण्यात येणार आहे, तर पुढील टप्प्यात पदवी प्रमाणपत्र, परदेशातील विद्यापीठांत प्रवेशासाठी आवश्यक गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, उत्तीर्णता प्रमाणपत्र अशी कागदपत्रे दिली जाणार आहेत. विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर परीक्षा विभागाकडून त्या संदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाईल. त्यानंतर ती कागदपत्रे विद्यार्थ्यांच्या 'स्टुडंट प्रोफाइल'मध्ये उपलब्ध होतील. त्यानंतर ती कागदपत्रे विद्यार्थ्यांना डाउनलोड करून घेता येतील.परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, की विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन कागदपत्रे, प्रमाणपत्रांची प्रक्रिया कागदविरहित करण्याची कल्पना आहे. त्यासाठीचा प्रस्ताव परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत मांडून मान्यता घेतली जाईल. विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यानंतर त्यांना त्याच्या अर्जाची प्रगती तपासण्याची सुविधाही देण्याचे काम सुरू आहे. ऑनलाइन पद्धतीने कागदपत्रे देण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये, संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना त्यांची शैक्षणिक कागदपत्रे आता सुलभपणे उपलब्ध होणार आहेत.

### प्रवेशासाठी आवश्यक गुणपत्रिका

» विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडून (स्टुडंट फॅसिलिटेशन सेंटर) विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे दिली जातात. त्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून, त्याची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठात सादर करावी लागते. या प्रक्रियेत बराच वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होते. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया केवळ ऑनलाइन पद्धतीने राबवण्याची मागणी विद्यार्थी संघटनांकडून करण्यात येत होती. तसेच अधिसभा सदस्यांनीही त्याबाबतची मागणी केली होती. तर पुढील टप्प्यात पदवी प्रमाणपत्र, परदेशातील विद्यापीठांत प्रवेशासाठी आवश्यक गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, उत्तीर्णता प्रमाणपत्र अशी कागदपत्रे दिली जाणार आहेत.

# पिंपरी-चिंचवडच्या शाळा हुशार!

## 'मुख्यमंत्री माझी शाळा' अभियानात महापालिकेचे क्रीडा प्रबोधिनी विद्यालय अव्वल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियाना'त 'अ', 'ब' वर्ग महापालिकांच्या सरकारी शाळांच्या गटात पुणे महापालिकेच्या डॉ. यशवंत गणपत शिंदे विद्यानिकेतन (क्रमांक १९) शाळेने पहिला क्रमांक पटकाविला आहे. दुसरा क्रमांक पिंपरी-चिंचवडच्या क्रीडा प्रबोधिनी विद्यालयाने मिळवला. खासगी शाळांमध्ये ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयाने (निगडी) पहिला आणि न्यू इंग्लिश स्कूल, रमणबागने तिसरा क्रमांक पटकाविला.**




शाळांनी यश संपादन केल्यामुळे त्यांना शैक्षणिक आणि पायाभूत विकासासाठी आर्थिक मदत उपलब्ध होणार आहे. पहिला क्रमांक प्राप्त केलेली डॉ. यशवंत गणपत शिंदे विद्यानिकेतन शाळा कात्रजमध्ये असून, पटसंख्या ७०४ आहे. सरकारी शाळा गटात तिसरा क्रमांक नाशिक येथील महापालिकेच्या शाळा क्रमांक ४९ने मिळवला.

खासगी शाळांच्या गटात दुसरा क्रमांक नागपूरमधील सरस्वती विद्यालय प्राथमिक शाळेने पटकाविला आहे. पुणे महापालिकेच्या शाळांचा विकास होण्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांनी विशेष लक्ष दिले आहे.

राज्यस्तरीय पुरस्काराबरोबरच विभागनिहाय पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुणे विभागातून सरकारी शाळा गटामध्ये पहिला क्रमांक जिल्हा परिषदेच्या पाबे येथील प्राथमिक शाळेने, दुसरा क्रमांक नगर जिल्हा परिषदेच्या संवत्सर प्राथमिक शाळेने आणि तिसरा क्रमांक चिंचणीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने (जि. सोलापूर) पटकावला आहे. खासग शाळा गटामध्ये प्रवरा कन्या विद्यामंदिर आणि लोणी काळभोरच्या ज्युनिअर कॉलेजने संयुक्तपणे पहिला क्रमांक पटकावला आहे.

दुसरा क्रमांक सोलापूर जिल्ह्यातील निंबर्गी येथील श्री बसवेश्वर शाळेने आणि तिसरा क्रमांक गुरुवर्य आर. पी. सबनीस विद्यामंदिर, नारायणगाव (पुणे) या शाळेने पटकावला आहे, अशी माहिती शालेय शिक्षण विभागाने दिली.

### अभियानात बक्षिसांची रक्कम 66 कोटींवर

**» राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या शाळेस 51 लाख, द्वितीय क्रमांक 21 लाख आणि तृतीय क्रमांकाच्या शाळेस 11 लाखाचे पारितोषिक देण्यात येणार आहे. या अभियानात राज्यस्तरावर-1, बृहन्मुंबई मनपा-1, अ व ब वर्ग मनपा-1, विभागस्तरीय-8, जिल्हास्तरीय-36, तालुकास्तरीय-358 अशी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका व 'अ' व 'ब' वर्ग महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रातील शाळांना पहिले 21 लाख, दुसरे 11 लाख व तिसरे पारितोषिक 7 लाख रूपयांचे असेल. 8 विभागीय स्तरावर पहिले 21 लाख, दुसरे 11 लाख, तिसरे 7 लाख रूपयांचे, जिल्हास्तरावर पहिले 11 लाख, दुसरे 5 लाख, तिसरे 3 लाख रुपये तर तालुकास्तरावर पहिले 3 लाख, दुसरे 2 लाख, तिसरे 1 लाख रुपये, अशी 66 कोटी 10 लाखाची बक्षिसे देण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री श्री.केसरकर यांनी सांगितले.**

> "आमच्या शाळेत क्रीडा सुविधांसोबतच शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. शैक्षणिक उपक्रमही यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत. त्यामुळे प्रवेशासाठी पालकांची पसंती शाळेला आहे. महापालिकेने विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी आतापर्यंत नऊ बस दिल्या आहेत.
>
> **- सुजाता कदम,**
> मुख्याध्यापिका, डॉ. यशवंत गणपत शिंदे विद्यानिकेतन शाळा.

> "शाळेत थ्रीडी प्रींटिंग, रोबोटिक्सची लॅब असून, दोन परकीय भाषाही शिकवल्या जातात. शाळांमध्ये शैक्षणिक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येतात. शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांचाही विकास झाला आहे. यामुळे शाळेला यश मिळाले आहे.
>
> **- मनीषा मिनोचा,** मुख्याध्यापिका, न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग.

### 'माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रम नियमितपणे राबविणार!

**» विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणासाठी तसेच शैक्षणिक गुणवत्ता विकसित होण्यासाठी 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हा उपक्रम नियमितपणे राबविण्यात येईल, असेही मंत्री श्री. केसरकर यांनी सांगितले. ते म्हणाले, शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्याचा निर्णय घेऊन 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हा उपक्रम राज्यात प्रथमच राबविण्यात आला.**

---

# पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या इमारतीची पायाभरणी!

## आमदार महेश लांडगे यांच्या 'व्हीजन-2020'मधील वचनपूर्ती

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील पक्षकार आणि वकील बांधवांच्या मागणीनुसार अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले न्यायालय संकुलाचा प्रश्न आता मार्गी लागला आहे. मोशी येथे सर्व सोयी-सुविधांयुक्त न्यायालय संकूल साकारात आहे. ही इमारत शहराच्या लौकीकामध्ये भर घालणारी ठरेल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.**




पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुलाच्या भव्य इमारतीचे भूमिपूजन बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या शुभहस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्रकुमार उपाध्याय, न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, न्यायमूर्ती संदीप मारणे, न्यायमूर्ती आरिफ सा. डॉक्टर आणि पुणे जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवडचे दिवाणी न्यायाधीश राजेश वानखेडे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रामराजे भोसले-पाटील यांच्यासह विधी क्षेत्रातील मान्यवर आणि वकील, विधीतज्ञ यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला.

दि. १ मार्च १९८९ साली पिंपरी-चिंचवड न्यायालयाची स्थापना झाली. मात्र, अद्याप इमारतीचा प्रश्न सुटला नव्हता. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने 'व्हीजन-२०२०' अभियानांतर्गत न्यायालय संकुलासाठी पाठपुरावा करण्यात आला. आमदार महेश लांडगे म्हणाले की, शहरातील न्यायालयाच्या स्थापनेपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सोडवण्यासाठी २०१४ पासून आम्ही प्रामाणिकपणे पाठपुरावा केला. राज्याचे नेते तथा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, कॅबिनेट मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे शहराच्या लौकिकात भर घालणाऱ्या या भव्य वस्तूची पायाभरणी होत आहे. ही पिंपरी-चिंचवडच्या नावलौकीकात भर घालणारी वास्तू निर्माण होईल. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पाहिलेले एक स्वप्न पूर्ण होत आहे, याचे समाधान वाटते. आगामी दोन वर्षांत या प्रशस्त व भव्य न्यायसंकुलाचे काम पूर्ण होईल आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्याहस्ते लोकार्पण होईल, असा विश्वास आ. लांडगे यांनी व्यक्त केला.

### असे असेल पिंपरी-चिंचवड न्यायालय!

**» मोशी येथे एकूण ९ मजले आणि २६ कोर्ट हॉल अशी पिंपरी-चिंचवड न्यायालयाची प्रशस्त इमारत उभारण्यात येणार आहे. त्यामध्ये रेन रुफ वॉटर हार्वेस्टिंग, प्रशस्त फर्निचर, अग्निशमन यंत्रणा, वाहनतळ, वातानुकुलित यंत्रणा, उद्वहन, सी.सी.टी.व्ही. सिस्टिम अशा आधुनिक सुविधा असतील. जिल्हा न्यायालय , वरिष्ठ स्तर दिवानी न्यायालय , कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय , मोटर व्हेईकल कोर्ट कौटुंबिक न्यायालय , सहकार न्यायालय , कामगार न्यायालय तसेच न्यायाधीशांसाठी निवासस्थान आदींचा समावेश आहे. न्यायसंकुल उभारण्यासाठी पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या हद्दीत बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील सेक्टर नंबर – १४ येथे सुमारे १६ एकर क्षेत्राची जागा महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेली आहे**



## भूमिका

**'कायदा गाढव आहे' ही म्हण पक्षांतर करणाऱ्यांनी राज्यघटनेच्या दहाव्या अनुसूचीतून शोधलेल्या पळवाटा आणि कायदेशीर कसरती यांना जितकी लागू पडते तितकी ती अन्य कुठेही चपखलपणे लागू पडत नसेल. कायद्याचा हेतू आणि त्याचा प्रत्यक्ष वापर यांच्यात इतके महदंतर असल्याचे किंवा घटनात्मक तरतुदींना मानवी हाव आणि ढोंग यांचा इतका उपद्रव झाल्याचेही उदाहरण दुसरे कुठले नसेल.**

# पक्षांतरबंदीचा 'गाढव' कायदा



त्या बिचाऱ्या गयालाल यांनी कधीकाळी १९६७ मध्ये दोनदा पक्षबदल केला होता आणि 'आयाराम- गयाराम' हे दूषण कायमचे त्यांना चिकटले होते, पण आज तर, १९८४ चा पक्षांतरबंदी कायदा अस्तित्वात असूनसुद्धा अत्यंत शिताफीने पक्षांतरे होताहेत. भारतीयांच्या 'जुगाड' मनोवृत्तीतून घटनात्मक कायदाही सुटला नाही, तो असा. बरे, हा कायदाच मोघम आहे किंवा त्याची तत्त्वेच कमकुवत आहेत असेही काही नाही. याआधीच्या निकालांचे पायंडेही स्वयंस्पष्ट आहेत. मणिपूरबाबत २०२० मध्ये सर्वोच्च न्यायालयानेच, पक्ष सोडणाऱ्या आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडून तीन महिन्यांत होणे उचित असल्याचा दंडक घालून दिला होता. पक्षातील 'फूट' म्हणजे काय, याची राज्यघटनेतील व्याख्या २००३ मध्येच सुधारून अधिक कठोर करण्यात आली होती आणि जरी दोनतृतीयांश सदस्य फुटले, तरीही त्यांचा 'वेगळा गट' अन्य पक्षात विलीन झाल्याखेरीज त्यांना पात्र आमदार मानले जाणार नाही, अशीही सुधारणा करण्यात आली होती, हे आज कुणाला माहीत नसते. याच सुधारणेनुसार, विधानसभा अध्यक्षांच्या आदेशांना न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते आणि त्याआधीच किहोटो प्रकरणात (१९९२) स्पष्ट झाल्याप्रमाणे, राज्यघटनेचे दहावे परिशिष्ट हे 'उच्चारस्वातंत्र्यावरील अ-वाजवी बंधन' मानले जाऊ शकत नाही. रवी नाईक (१९९४) प्रकरणात हे स्पष्ट झाले की स्वेच्छेने पक्षत्याग हा केवळ राजीनामा नसून त्यात अन्य हेतूही समाविष्ट असू शकतात, तर विश्वनाथन (१९९६) प्रकरणातून, पक्षानेच एखाद्या निर्वाचित आमदाराला बडतर्फ केले तरी अशा आमदाराने अन्य पक्षात प्रवेश करेपर्यंत त्याला पक्षांतरबंदीचे नियम लागू नसून तो मूळच्या पक्षाचाच 'असंलग्न सदस्य' मानला जाईल, हे स्पष्ट झाले होते.पक्षादेश झुगारणे हेही पक्षविरोधी वर्तनच मानले जावे आणि असे सदस्य अपात्र ठरावेत, असेही पायंडे आहेत. आज काही सदस्य अन्य पक्षांच्या 'संपर्कात' असल्याची जी दृश्ये वृत्तवाहिन्या सहज दाखवतात, त्यातूनही अपात्रता ओढवू शकते. स्वपक्षाच्या संपर्कात न राहाणे, विधिमंडळ पक्ष बैठकीस गैरहजेरी, सरकार पाडण्याच्या धमक्या हे सारे 'स्वेच्छेने पक्षत्याग' मानले जाऊ शकते हे नाईक व बाळासाहेब पाटील प्रकरणांत स्पष्ट झाले. तसेच, अशा सदस्यांकडून सात ते १४ दिवसांत उत्तर मागणारी नोटीस काढण्याची तरतूद असली तरी अध्यक्ष हा अवधी दोन ते तीन दिवसांवर आणू शकतात, हेही याच प्रकरणांतून ठसले. राजेंद्र राणा, सुबोध उनियाल यांच्या प्रकरणांत तर, सत्तास्थापनेसाठी विरोधी पक्षास बोलवा असे राज्यपालांना लिहिणे अथवा विरोधी पक्षनेत्यांस भेटून त्यांच्यासह प्रवास करणे हेही पक्षविरोधी ठरले होते. या उदात्त तत्त्वांमागचे वास्तव पूर्णपणे भिन्न आहे. प्रथमत:, बहुतेक संभाव्य पक्षांतर करणारे आधीच, विधानसभाध्यक्षांवर अविश्वास व्यक्त करणारे पत्र लिहितात व दुसऱ्या दिवशी फुटतात. नबाम रेबिया प्रकरणात अशामुळेच सर्वोच्च न्यायालयाने एका परिच्छेदात मोघमपणे नोंदवले की, ज्यावर सदस्यांचा अविश्वास आहे तो अध्यक्ष स्वत:च अपात्र ठरत असल्याने इतरांचा निर्णय तो घेऊ शकत नाही.. या हास्यास्पद अन्वयार्थाला सर्वोच्च न्यायालयाच्याच मोठ्या खंडपीठापुढे पुन्हा आव्हान देण्यात आलेले आहे.दुसरे असे की, मुळात विधानसभाध्यक्ष हे पद पक्षातीत, म्हणून तर त्यांना अधिक अधिकार हे तत्त्वांपुरतेच राहते आणि अध्यक्ष मंडळी पक्षीय लिप्ताळेच- विशेषत: सत्ताधारी पक्षातली जवळीकच- जपतात. त्यामुळे मग विरोधी पक्षांतून सत्ताधारी गोटात आलेल्यांबाबत निर्णय घेण्यास अवाजवी कालहरण करण्याचे प्रकार होतात. तेवढ्या काळात फुटीर आमदारांचे चांगलेच फावते आणि ते त्यांनी सोडलेल्या स्वपक्षाला आणखी अडचणीत आणू शकतात.

## संपादकीय »

# विद्यार्थी वाऱ्यावर..

***दोन महत्त्वाच्या परीक्षा केवळ पेपरफुटीमुळे रद्द करण्याची वेळ सरकारांवर येत असेल तर याबाबतच्या सरकारी क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणारच..***

पायाभूत सोयीसुविधांची उभारणी प्रगतीसाठी महत्त्वाची खरीच. रस्ते, महामार्ग, अतिजलद महामार्ग, रेल्वे, वीज, विमानतळे, बंदरे यांच्या जोडीने अलीकडच्या काळात आवश्यक अशा इंटरनेट सोयीसुविधा आदी पुरवणे हे सरकारांचे कर्तव्यच. या सगळ्याचे वर्णन 'भौतिक सोयीसुविधा' (फिजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) असे करता येईल. हे आवश्यकच. पण याच्या जोडीने किंबहुना यापेक्षाही अधिक आवश्यक असतात त्या संस्थात्मक सोयीसुविधा (इन्स्टिटय़ूशनल इन्फ्रास्ट्रक्चर).उत्तम शैक्षणिक सुविधा- म्हणजे चकचकीत महाविद्यालये, त्यात पंचतारांकित सुविधा इत्यादी- उभ्या केल्या. पण विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनासाठी चोख परीक्षा पद्धत, उच्च दर्जाची शैक्षणिक सुविधा आणि ते शिक्षण देणारा गुणवंत अध्यापकवर्ग नसेल तर नुसत्या इमारतींचा काहीही उपयोग होत नाही.

केंद्र शासनाचे 'सर्वासाठी घरे-२०२४' हे धोरण राबविण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून राज्य सरकार 'महा आवास अभियान २०२३-२४' अभियान राबवत आहे. त्याअंतर्गत सर्वसामान्यांना सात लाख घरकुले उपलब्ध करून देण्याचा निर्धार असून त्यासाठी विविध सरकारी योजनांत समन्वय साधला जात आहे..

# घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार!

राज्यातील ७ लाख लाभार्थींचे स्वत:च्या पक्क्या घरकुलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ग्राम विकास मंत्रालयाच्या वतीने २० नोव्हेंबर २०२३ ते ३१ मार्च, २०२४ या कालावधीत 'महा आवास अभियान २०२३-२४' राबविण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासनाच्या वतीने 'सर्वासाठी घरे-२०२४' हे धोरण राबविण्यात येत आहे. राज्य शासनानेदेखील या धोरणाचा स्वीकार केला आहे.

राज्यात संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांच्या यंत्रणेच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल



करण्याची योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनाही राबविण्यात येत आहेत. लाभार्थींना सर्व सुविधांनी युक्त असे घरकुल उपलब्ध करून द्यावे, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारी घरकुले बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय आहे. 'सर्वासाठी घरे-२०२४' या शासनाच्या धोरणांतर्गत गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास गती देणे आणि त्यात गुणवत्ता आणणे या हेतूने गतवर्षी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त २० नोव्हेंबर, २०२२ या राष्ट्रीय आवास दिनापासून ५ जून, २०२३ पर्यंत 'अमृत महाआवास अभियान २०२२-२३' राबविण्यात आले.

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांना गती देण्यासाठी आणि त्यांत गुणवत्ता आणण्यासाठी 'अमृत महाआवास अभियान २०२२-२३' अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. ३३ हजार ६८० भूमिहीन लाभार्थींना घरकुल बांधकामासाठी जागा देण्यात आली. जागेच्या वाढत्या किमती व कमी जागेत जास्त लाभार्थींना सामावून घेण्यासाठी एक हजार १५२ बहुमजली इमारती, २७९ गृहसंकुले, १२ हाऊसिंग अपार्टमेंट आणि आठ हजार ९७२ लॅण्ड बँक्स उभारण्यात आणि वितरित करण्यात आल्या. केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरित करण्यात आलेल्या घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे दोन लाख ६९ हजार ८५५ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. तीन लाख २५ हजार २७८ लाभार्थींना पहिला हप्ता वितरित करण्यात आला. त्यासोबतच घरकुलाच्या प्रगतीनुसार सर्व हप्त्यांचे वितरण विनाविलंब करण्यात आले. इच्छुक लाभार्थींना वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज उपलब्धतेसाठी सहकार्य केले गेले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गद्दारांच्या नायकाला म्हणावं दाढी खाजव!

## उद्धव ठाकरेंची पनवेल दौऱ्यादरम्यान एकनाथ शिंदेंवर टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आज माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी त्यांच्या पनवेल दौऱ्यादरम्यान भाजपावर आणि एकनाथ शिंदे तसंच अजित पवारांवर कडाडून टीका केली. रायगड आणि मावळ हा मतदारसंघ म्हणजे एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराजांचं जन्मस्थान आणि दुसऱ्या बाजूला त्यांची राजधानी. अशा ठिकाणी आपला पवित्र भगवा फडकणार नाही तर मग दुसरं कुठलं फडकं फडकणार? असा सवाल करत उद्धव ठाकरेंनी भाजपा, शिंदे गट आणि अजित पवार गटावर तुफान टीका केली.**




तसंच मी पुन्हा येईन या देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याचा संदर्भत ठाकरी शैलीत पंतप्रधान नरेंद्र मोदींचाही समाचार घेतला. तर एकनाथ शिंदेंचा उल्लेख त्यांनी गद्दारांचा नायक असा केला. आपल्या भाषणात उद्धव ठाकरे म्हणाले, “इथल्या खासदाराने गद्दारी केली आहे त्याला तर आडवा करायचाच पण जे सर्वपक्षीय शेठ आहेत म्हणजे काय ज्यांचं सरकार येतं त्यांच्याकडे जायचं. कुठेही गेलं की आपलं दुकान चालू.. म्हणजे राजकारणातली दुकानदारी करणारे आहेत त्यांची दुकानं बंद करायची आहेत. मी भाजपाबाबत म्हटलं आहे की अब की बार भाजपा तडीपार ते करायचं आहे. कारण इतका खोटारडा पक्ष देशाच्या राजकारणात जन्माला आला नव्हता.”एवढी फोडाफोडी केली, तरीही कट्टर शिवसैनिक हे शिवसेनेबरोबरच आहेत. त्यांना शिवसेनेने फक्त प्रेम दिलं. माधवराव भिडे इथे आहेत. मी लहानपणापासून त्यांना पाहतोय. शिरीष बुटाला आहेत. बाळासाहेबानंतर इतकी वर्षे झाली पण त्यांनी शिवसेना सोडली नाही. याला म्हणतात निष्ठा. हे जे काही गद्दार आहेत त्या गद्दारांचा नायक आहे त्यालाही विचारा तू दाढी खाजवत जरा आठव.. कारण आपण काही आठवायचं असेल तर डोकं खाजवतो हा दाढी खाजवतो. स्वतःचीच दाढी तू स्वतःच खाजव खरंतर पैसे खूप आहेत दाढी खाजवायलाही माणसं ठेवली असतील तर माहीत नाही. पण तुम्हाला मी काय दिलं नव्हतं? शिवसेनेने देता येईल ते सगळं तुम्हाला दिलं तरीही आमच्या पाठीत वार केला. शिवसेना ही ओळख तुमच्यासमोर आले म्हणून निवडून आलात. यांना वाटलं की घोड्यावर बसलोय म्हणजे घोडा माझाच. आता घोडा कसा लाथ घालतो ते कळेल आता.” असं म्हणत उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवरही टीका केली.नरेंद्र मोदी म्हणत आहेत काँग्रेसने देशाला लुटलं. कुणाच्या खात्यात किती पैसे आहेत काढा. भाजपाच्या खात्यात सहा ते सात हजार कोटी आहेत. तर काँग्रेसच्या खात्यात किती आहेत? ६०० ते ७०० कोटी आहेत. मग देशाला लुटलं कुणी? मोदी आणि भाजपानेच मागच्या दहा वर्षांत देश लुटला आहे. पीएम केअर फंडात किती पैसे? हे कुणालाही माहीत नाही. करोना काळात तो फंड आला. भाजपाच्या लोकांनीही पीएम केअरला पैसे दिले. तो फंड खासगी असेल तर त्याचा बाप कोण? उद्या इंडियाचा पंतप्रधान झाल्यावर आमच्या पंतप्रधानाला तो फंड विनियोग करता येईल की नाही ते भाजपाने सांगावंभाजपाने शिवसेना फोडली. त्यानंतर मोदींनी ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा उल्लेख केला. चार दिवसात अजित पवार तिकडे. निर्मला सीतारमण यांनी श्वेतपत्रिका आणली, त्यात आदर्श घोटाळ्याचा उल्लेख केला. लगेच अशोक चव्हाण तिकडे गेले. हे सगळं जर पाहिलं तर भाजपा हा पक्ष नाही तर सडकी, कुचकी वृत्ती आहे. ही वृत्ती आपल्याला देशातून तडीपार करावी लागेल असंही आवाहन उद्धव ठाकरेंनी केलं.तसंच मी पुन्हा येईन या देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याचा संदर्भत ठाकरी शैलीत पंतप्रधान नरेंद्र मोदींचाही समाचार घेतला. तर एकनाथ शिंदेंचा उल्लेख त्यांनी गद्दारांचा नायक असा केला. आपल्या भाषणात उद्धव ठाकरे म्हणाले, “इथल्या खासदाराने गद्दारी केली आहे त्याला तर आडवा करायचाच पण जे सर्वपक्षीय शेठ आहेत म्हणजे काय ज्यांचं सरकार येतं त्यांच्याकडे जायचं. कुठेही गेलं की आपलं दुकान चालू.. म्हणजे राजकारणातली दुकानदारी करणारे आहेत त्यांची दुकानं बंद करायची आहेत. मी भाजपाबाबत म्हटलं आहे की अब की बार भाजपा तडीपार ते करायचं आहे. कारण इतका खोटारडा पक्ष देशाच्या राजकारणात जन्माला आला नव्हता.

### भाजपा हा पक्ष नाही तर सडकी वृत्ती


» ”एवढी फोडाफोडी केली, तरीही कट्टर शिवसैनिक हे शिवसेनेबरोबरच आहेत. त्यांना शिवसेनेने फक्त प्रेम दिलं. माधवराव भिडे इथे आहेत. मी लहानपणापासून त्यांना पाहतोय. शिरीष बुटाला आहेत. बाळासाहेबानंतर इतकी वर्षे झाली पण त्यांनी शिवसेना सोडली नाही. याला म्हणतात निष्ठा. हे जे काही गद्दार आहेत त्या गद्दारांचा नायक आहे त्यालाही विचारा तू दाढी खाजवत जरा आठव.. कारण आपण काही आठवायचं असेल तर डोकं खाजवतो हा दाढी खाजवतो. स्वतःचीच दाढी तू स्वतःच खाजव खरंतर पैसे खूप आहेत दाढी खाजवायलाही माणसं ठेवली असतील तर माहीत नाही.

# ठाकरे पुन्हा भाजपसोबत जाणार नाही, लिहून द्या

## मविआ आघाडीतील लोकसभा जागावाटपाची चर्चा फिस्कटणार?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला सोबत घ्यायचे की नाही, यावरुन सध्या महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांमध्ये खल सुरु आहे. या एका मुद्द्यावरुन मविआचे लोकसभा निवडणुकीचे जागावाटप अडून राहिले आहे.**



त्यामुळे मविआ आणि वंचितच्या युतीविषयी अद्यापही संभ्रमाचे वातावरण आहे. दोन्ही बाजूचे नेते परस्परांविषयी सावधपणे प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. अशातच आता एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. लोकसभा जागावाटपासाठी झालेल्या एका बैठकीत वंचितने मविआतील ठाकरे गट आणि शरद पवार गटासमोर एक अट ठेवली होती. निवडणुकीनंतर तुम्ही पुन्हा भाजप किंवा आरएसएससोबत समझोता करणार नाही, याची हमी द्या, असे वंचितने सांगितले. मात्र, त्यावेळी ठाकरे गटाच्या संजय राऊतयांनी वंचित बहुजन आघाडीची ही मागणी नाकारली होती. वंचित आघाडीने आमदार जितेंद्र आव्हाडयांना लिहलेल्या जाहीर पत्रात तसा उल्लेख करण्यात आला आहे. हे पत्र सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. आमदार जितेंद्र आव्हाड नुकतेच सोशल मीडियावर प्रकाश आंबेडकर यांना उद्देशून एक संदेश लिहला होता. देशाचे संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी आपण सगळ्यांना एकत्र येण्याची गरज आहे. जर या संविधानाला हात लावला गेला तर पुढील पिढी आपणाला कधीच माफ करणार नाही.लवकरात लवकर समविचारी पक्षांसोबत एखादी बैठक घेऊन महाराष्ट्रात तसा संदेश जाईल, याची व्यवस्था करुया, असे आवाहन जितेंद्र आव्हाड यांनी आंबेडकरांना केले होते.

### बीजेपीबरोबर समझोता...

» राष्ट्रवादीचे नेते म्हणून लिहीलेले नाही असे आम्ही समजतो. आम्ही नेहमी मानत आलो आहोत की पक्षाची असो की व्यक्तीगत, राजकारणाची भूमिका एकच असली पाहिजे. आपण या अगोदरही बीजेपीबरोबर समझोत्यामध्ये होता, आजही समझोत्यामध्ये आहात आणि यापुढे राहाल याबद्दल व्यक्तीगतरित्या खात्री आहे.

# मंदिरात घुसले गैर-हिंदू बांगलादेशी!

## मंदिर प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचं उल्लंघन

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

ओडिशामधल्या पुरी येथील जगन्नाथ मंदिरात अनधिकृतपणे प्रवेश केल्याच्या आरोपाखाली ओडिशा पोलिसांनी नऊ बांगलादेशींना ताब्यात घेतलं आहे. सोमवारी (४ मार्च) एका अधिकाऱ्याने अधिकृतपणे याबाबतची माहिती देताना सांगितलं की, मंदिर प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचं उल्लंघन करून काही गैर हिंदू बांगलादेशी मंदिरात प्रवेश करत होते. त्यांना मंदिर परिसरातून ताब्यात घेण्यात आलं आहे. विश्व हिंदू परिषदेच्या काही कार्यकर्त्यांनी याप्रकरणी तक्रार केली होती. या कार्यकर्त्यांनी तक्रारीत म्हटलं होतं की, काही गैर हिंदू बांगलादेशी इसम पुरातन मंदिरात प्रवेश करत आहेत. तसेच मंदिर समितीच्या नियमांचं उल्लंघन करत आहेत. त्यानंतर याप्रकरणी सिंहद्वार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी नऊ बांगलादेशी इसमांना ताब्यात घेतलं आहे.



पुरीचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुशील मिश्रा म्हणाले, आम्हाला काही बांगलादेशी गैर-हिंदूंनी मंदिरात प्रवेश केल्याबाबतची तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांचं एक पथक मंदिराकडे रवाना झालं. या संशयास्पद इसमांना पोलिसांनी अडवलं आणि ताब्यात घेतलं. त्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली. त्यांच्या संशयास्पद हालचाली पाहता आम्ही नऊ बांगलादेशींना ताब्यात घेतलं आहे. तसेच काही वरिष्ठ अधिकारी त्यांची चौकशी करत आहेत.मदिराच्या नियमांनुसार या मंदिरात केवळ हिंदू भाविक प्रवेश करू शकतात. सुशील मिश्रा यांनी सांगितलं की, ज्या बांगलादेशींना ताब्यात घेतलं आहे ते गैर हिंदू असतील तर त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल. ओडिशामधल्या पुरी येथील जगन्नाथ मंदिरात अनधिकृतपणे प्रवेश केल्याच्या आरोपाखाली ओडिशा पोलिसांनी नऊ बांगलादेशींना ताब्यात घेतलं आहे. सोमवारी (४ मार्च) एका अधिकाऱ्याने अधिकृतपणे याबाबतची माहिती देताना सांगितलं की, मंदिर प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचं उल्लंघन करून काही गैर हिंदू बांगलादेशी मंदिरात प्रवेश करत होते. त्यांना मंदिर परिसरातून ताब्यात घेण्यात आलं आहे.

विश्व हिंदू परिषदेच्या काही कार्यकर्त्यांनी याप्रकरणी तक्रार केली होती. या कार्यकर्त्यांनी तक्रारीत म्हटलं होतं की, काही गैर हिंदू बांगलादेशी इसम पुरातन मंदिरात प्रवेश करत आहेत. तसेच मंदिर समितीच्या नियमांचं उल्लंघन करत आहेत. त्यानंतर याप्रकरणी सिंहद्वार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी नऊ बांगलादेशी इसमांना ताब्यात घेतलं आहे. आम्ही त्यांचे पासपोर्ट तपासले आहेत. तपासाअंती लक्षात आलं आहे की, या नऊ जणांपैकी एक इसम हिंदू आहे. इतरांचे पासपोर्ट आणि इतर दस्तावेजांची तपासणी केली जात आहे. आम्ही ज्या नऊ जणांना ताब्यात घेतलंय, त्यापैकी चार जणांनी मंदिरात प्रवेश केला होता.हिंदू आणि मांसाहारी व्यक्तींना मंदिरात जाण्याची परवानगी नाही. अलीकडेच यूट्युबर काम्या जानीच्या जगन्नाथ मंदिर दर्शनावरून मोठा वाद उफाळला होता. काम्या जानी गोमांस खात असल्याचा दावा काही लोकांनी केला होता. गोमांस खाणारी काम्या जानी जगन्नाथ मंदिरात गेलीच कशी? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. गोमांस खाणाऱ्यांना मंदिरात जाण्याची परवानगी नसून काम्या जानीने मंदिरात प्रवेश केल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता. परंतु, काम्या जानीने नंतर स्पष्टीकरण दिलं की, ती गोमांस खात नाही.सोमवारी (४ मार्च) एका अधिकाऱ्याने अधिकृतपणे याबाबतची माहिती देताना सांगितलं की, मंदिर प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचं उल्लंघन करून काही गैर हिंदू बांगलादेशी मंदिरात प्रवेश करत होते. त्यांना मंदिर परिसरातून ताब्यात घेण्यात आलं आहेतक्रारीत म्हटलं होतं की, काही गैर हिंदू बांगलादेशी इसम पुरातन मंदिरात प्रवेश करत आहेत. तसेच मंदिर समितीच्या नियमांचं उल्लंघन करत आहेत. त्यानंतर याप्रकरणी सिंहद्वार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

### नऊ बांगलादेशींना ताब्यात घेतलं

» पुरीचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुशील मिश्रा म्हणाले, आम्हाला काही बांगलादेशी गैर-हिंदूंनी मंदिरात प्रवेश केल्याबाबतची तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांचं एक पथक मंदिराकडे रवाना झालं. या संशयास्पद इसमांना पोलिसांनी अडवलं आणि ताब्यात घेतलं. त्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली. त्यांच्या संशयास्पद हालचाली पाहता आम्ही नऊ बांगलादेशींना ताब्यात घेतलं आहे. तसेच काही वरिष्ठ अधिकारी त्यांची चौकशी करत आहेत.मदिराच्या नियमांनुसार या मंदिरात केवळ हिंदू भाविक प्रवेश करू शकतात. सुशील मिश्रा यांनी सांगितलं की, ज्या बांगलादेशींना ताब्यात घेतलं आहे ते गैर हिंदू असतील तर त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल. ओडिशामधल्या पुरी येथील जगन्नाथ मंदिरात अनधिकृतपणे प्रवेश केल्याच्या आरोपाखाली ओडिशा पोलिसांनी नऊ बांगलादेशींना ताब्यात घेतलं आहे. सोमवारी (४ मार्च) एका अधिकाऱ्याने अधिकृतपणे याबाबतची माहिती देताना सांगितलं की, मंदिर प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचं उल्लंघन करून काही गैर हिंदू बांगलादेशी मंदिरात प्रवेश करत होते.

# १० मार्चला रेल्वे, बसमधून शेतकरी दिल्लीत घुसणार?

## पंजब हरियाणातील शेतकऱ्यांनी आंदोलनाची पुढची दिशा जाहीर

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

किमान आधारभूत किंमत (एमएसपी) म्हणजे हमीभावासाठी कायदा करावा, या मुख्य मागणीसह स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, तसेच इतर मागण्यांसाठी दिल्लीजवळच्या शंभू आणि खनौरी सीमेवर ठाण मांडून बसलेल्या पंजाब आणि हरियाणातील शेतकऱ्यांनी त्यांच्या आंदोलनाची पुढची दिशा जाहीर केली आहे.

शेतकऱ्यांनी सांगितलं की, ते लगेच दिल्लीकडे कूच करणार नाहीत. ते हरियाणा-दिल्लीच्या सीमेवरच ठाण मांडून बसतील. दरम्यान, या शेतकऱ्यांनी देशभरातील इतर शेतकऱ्यांना या आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. यासह शेतकरी १० मार्च रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत रेल रोको आंदोलन करणार आहेत. शेतकरी नेते सर्वनसिंग पंढेर म्हणाले, पंजाबच्या खनौरी आणि शंभू सीमेवरून शेतकऱ्यांना पुढे सरकू दिलं जात नाहीये. त्यामुळे ६ मार्च रोजी देशातील इतर राज्यांमधील शेतकरी बस आणि



रेल्वेने दिल्लीला जाणार आहेत. शेतकरी आपल्या मागण्यांसाठी जंतर-मंतरवर सरकारविरोधात आंदोलन करतील. परंतु, पंजाबचे शेतकरी शंभू आणि खनौरी सीमेवरच आंदोलन करतील. शंभू आणि खनौरी सीमेवरील आंदोलन अधिक मजबूत करण्यासाठी आंदोलक शेतकऱ्यांची संख्या अधिक वाढवली जाणार आहे. शेतकरी नेते पंढेर म्हणाले, आमचं दिल्लीच्या सीमांवरील आंदोलन चालूच राहील. शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत तोवर आम्ही मागे हटणार नाही. सरकारला आमच्या ट्रॅक्टर्सची भीती आहे. त्यांना आमच्या ट्रॅक्टर्समध्ये रणगाडे दिसतायत.

### शेतकरी संघटनांच्या मुख्य मागण्या

» काही नेते तर म्हणतायत आम्ही आमचे ट्रॅक्टर्स मॉडिफाय केलेत. आम्ही आमच्या ट्रॅक्टर्सने सरकारला इजा पोहोचवू अशी भीती त्यांना सतावतेय. आम्हाला आशा आहे की आमचे जे सहकारी शेतकरी रेल्वे आणि बसमधून दिल्लीला जातायत त्यांना अडवलं जाणार नाही.किमान आधारभूत किंमत (एमएसपी – मिनिमम सपोर्ट प्राईस) म्हणजेच हमीभावासाठी कायदा करावा आयात शुल्कात वाढ करावी; ५८ वर्षांवरील शेतकरी आणि शेतमजुरांना पेन्शन योजना लागू करावी; शेतकऱ्यांना दर महिन्याला दहा हजार रुपये पेन्शन द्यावी; शेतजमिनीचे संपादन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार करावे, केंद्र सरकारने भूसंपादनाबाबत राज्यांना दिलेल्या सूचना रद्द कराव्यात.

# सुमीत पुसावळेचं कुटुंबीयांसह सेलिब्रेशन

'स्टार प्रवाह' वाहिनीवर लवकरच 'घरोघरी मातीच्या चुली' ही नवी मलिका सुरू होणार आहे. अभिनेत्री रेश्मा शिंदे, सविता प्रभुणे, प्रमोद पवार, उदय नेने, आरोही सांबरे अभिनीत ही मालिका १८ मार्चपासून संध्याकाळी ७.३० वाजता पाहायला मिळणार आहे. या मालिकेत हृषिकेश या प्रमुख भूमिकेसाठी अभिनेता सुमीत पुसावळेची वर्णी लागली आहे. याआधी सुमीत 'बाळूमामाच्या नावानं चांगभलं' या मालिकेत झळकला होता. पण आता मालिकेतून त्याने एक्झिट घेत तो नव्या रुपात भेटीस येणार आहे. अलीकडेच अभिनेता सुमीत पुसावळे 'घरोघरी मातील चुली' या मालिकेत झळकणार असल्याचं जाहीर झालं. तेव्हापासून तो चर्चेत आला आहे. सुमीतने या नव्या प्रवासानिमित्ताने कुटुंबियांबरोबर सेलिब्रेशन केलं. याचा व्हिडीओ अभिनेत्याची बायको मोनिका पुसावळेने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. याशिवाय मोनिकाने सुमीतसाठी इन्स्टाग्राम स्टोरीवरही खास पोस्ट लिहिल्या होत्या.'बाळूमामांच्या नावानं चांगभलं' या मालिकेतील सुमीतचा प्रवास संपल्याच्यानिमित्ताने मोनिकाचे काही फोटो शेअर करत पोस्ट लिहिली. मोनिकाने लिहिलं की, सुमीत तुझ्या कामाबद्दलचं प्रेम, निष्ठा, मामांवरचं प्रेम, विश्वास हे सगळं मी खूप जवळून अनुभवलं आहे. तू मामांचं कार्य घराघरात पोहोचवलं. उन्ह असो, पाऊस असो कधी तू आणि तुझी टीम थांबली नाही. मला आज बायको म्हणून खूप अभिमान वाटतोय. तुला प्रत्येकाने जे प्रेम दिलं आहे ते असंच कायम राहो आणि तुझ्या मनातल्या सर्व इच्छा पूर्ण व्हावी हिच मामांच्या चरणी प्रार्थना.

# 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' पोहोचली ऑस्ट्रेलियात!

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम घराघरांत लोकप्रिय आहे. यामधील प्रत्येक विनोदवीर प्रेक्षकांना आपलासा वाटतो. हास्यजत्रेमुळे अनेक नवोदित कलाकारांना एक वेगळी ओळख मिळाली. परदेशातील प्रेक्षकांना सुद्धा या कार्यक्रमाची तुफान क्रेझ आहे. त्यामुळे हास्यजत्रेची टीम अनेकदा परदेश दौऱ्यावर जाऊन तेथील प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. गेल्यावर्षी ही संपूर्ण टीम अमेरिका दौऱ्यावर गेली होती. आता यंदाच्या वर्षी महाराष्ट्राला खळखळून हसवणारे हे विनोदवीर ऑस्ट्रेलियात पोहोचले आहेत. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'ची संपूर्ण टीम ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेली असून याठिकाणी सिडनी, मेलबर्न अशा महत्त्वाच्या शहरांमध्ये हे कलाकार लाइव्ह परफॉर्म करणार आहेत. विनोदवीरांसह या कार्यक्रमाची सूत्रसंचालिका अभिनेत्री प्राजक्ता माळी देखील ऑस्ट्रेलियात पोहोचली आहे. याठिकाणी या संपूर्ण टीमने मिळून एका ट्रेंडिंग गाण्यावर जबदस्त डान्स केला. याचा खास व्हिडीओ प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनारी प्राजक्तासह पृथ्वीक प्रताप, सचिन मोटे, समीर चौघुले, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, चेतना भट या सगळ्या कलाकारांनी मिळून "कुडिये नी..." या लोकप्रिय गाण्यावर डान्स केला."आम्ही ऑस्ट्रेलियात एकत्र अशी मजा करतोय... सचिन मोटे सर सुद्धा सामील झाले, याचा विशेष आनंद!" असं कॅप्शन प्राजक्ता माळीने या व्हिडीओला दिलं आहे.

# साराची सर्वोत्कृष्ट भूमिका?

सारा अली खान नावाच्या अभिनेत्रीची आजवरची सर्वोत्कृष्ट भूमिका म्हणून तिच्या ए वतन मेरे वतन नावाच्या चित्रपटाचे नाव सांगावे लागेल. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया सोशल (AE WATAN MERE WATAN TRAILER NEWS) मीडियावर नेटकऱ्यांकडून येत आहेत. त्याला कारण या चित्रपटाचा व्हायरल झालेला ट्रेलर. बऱ्याच दिवसांपासून या चित्रपटाच्या ट्रेलरची चर्चा रंगली आहे. गेल्या वर्षी सारानं तिच्या चित्रपटांनं नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. तिचा विकी कौशल सोबत प्रदर्शित झालेला चित्रपटही चर्चेचा (SARA ALI KHAN VIRAL NEWS) विषय होता. या सगळ्यात ॲमेझॉन प्राईमवर प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातून साराचा एक वेगळाच अंदाज दिसून येतो. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा तो काळ. इंग्रजांची ती जुलमी राजवट मोडून काढण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीनं मोहिमा सुरु होत्या. त्यातील एका मोहिमेचं प्रतिनिधीत्व सारा अली खान करते आहे.मेरे वतन हा अशा एका महिलेची कथा सांगतो जिनं तिच्या धाडसीपणानं देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्वाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटामध्ये सारानं उषा नावाच्या मुलीची भूमिका वठवली असून त्यात तिचा स्वातंत्र्याप्रतीचा संघर्ष दिसून आला आहे. १९४२ साली भारत छोडो जे आंदोलन छेडले गेले त्यात भूमीगत राहून रेडिओ स्टेशन चालवण्याचे काम उषानं केलं होतं. ते हे या चित्रपटातून दिसून येते. ट्रेलरच्या सुरुवातीला दिसते की, सारा अली खान ही हातात तिरंगा घेतलेली दिसते.



# अरेंज मॅरेजमधून उलगडणार लव्ह स्टोरी

लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वेने नेहमीच चर्चेत असते. 'देवयानी' या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी 'ऊन सावली' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. 'ऊन सावली' हा चित्रपट प्रणय आणि आन्वीची प्रेमकथा आहे. 'एक अरेन्ज मॅरेज ही अद्भुत लव स्टोरी असू शकते' ह्या वाक्यात 'ऊन सावलीचे' गूढ लपलेले आहे. एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणारे हे सुंदर जोडपं बरच काही सांगू पाहत आहे, बरच काही बोलू इच्छित आहेत. पहिल्या भेटीतच प्रणयला आन्वी आवडते. परंतु आन्वीचा विरोध हा कायम आहे. तिच्या मनात तर वेगळाच गोंधळ चालू आहे. हा चित्रपट लग्न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्वतःशी जोडणारा आहे.तिकीट विंडो पिक्चर्स बॅनरअंतर्गत समीर ए शेखद्वारा या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सार्थक नकुल यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. या चित्रपटात भूषण व शिवानीबरोबर अजिंक्य ननावरे, राज सरनागत, अंकिता भोईर, विकास हांडे, श्वेता कामत, प्रिया तुळजापूरकर आणि मनाली निकम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १५ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वेने नेहमीच चर्चेत असते. 'देवयानी' या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी 'ऊन सावली' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. 'ऊन सावली' हा चित्रपट प्रणय आणि आन्वीची प्रेमकथा आहे. 'एक अरेन्ज मॅरेज ही अद्भुत लव स्टोरी असू शकते' ह्या वाक्यात 'ऊन सावलीचे' गूढ लपलेले आहे. एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणारे हे सुंदर जोडपं बरच काही सांगू पाहत आहे, बरच काही बोलू इच्छित आहेत.

# माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते

मनिषा राणी ही आता झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनची विजेती झाली आहे. त्यानंतर तिची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून तिच्या नावाची जोरदार चर्चा होती. अखेर तिच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. सोशल मीडियावर एक दिवस अगोदरच मनिषाचं नाव विजयी म्हणून समोर आले होते. टीव्ही मनोरंजन क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून सुरु असणाऱ्या रियॅलिटी शो मध्ये झलक दिखला जा चे नाव घेता येईल. या रियॅलिटी शो चा अकरावा सीझन पार पडला असून त्यातील सहभागी स्पर्धकांविषयी चाहत्यांना कमालीची उत्सुकता असल्याचे दिसून आले आहे. अशातच मनिषा राणीनं विजेतेपद मिळवल्यानंतर तिनं दिलेल्या प्रतिक्रियेनं नेटकऱ्यांच्या चर्चेला उधाण आले आहे. सोशल मीडियावर मनिषाच्या नावाची चर्चा आहे. ती विजयी होताच तिच्याव चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. या सगळ्यात मनिषाची प्रतिक्रिया देखील चर्चेत आली आहे. ती नेमकी काय म्हणाली हेही आपण जाणून घेऊयात. मनिषाला झलक दिखला जा चे विजेतेपद मिळवल्यानंतर तिला ३० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात आले. त्यानंतर तिनं इंस्टावरुन चाहत्यांचे आभार मानले आहेत. तिनं म्हटलं आहे की, मी माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते. त्यांच्या मुळेच हा प्रवास शक्य झाला. त्यांनी केलेल्या सहकार्याविषयी मी त्यांची आभारी आहे.त्या व्हिडिओच्या शेवटी ती म्हणते की, मी आता जे काही पाहते आहे ते सगळं खरं आहे यावर माझा विश्वासच बसत नाही. माझ्यासाठी एक ते दीड लाख वोटिंग एका दिवसांत आली. मला एवढं प्रेम मिळालं हेच माझ्यासाठी खूप आहे. लोकांनी मला जे खूप सहकार्य केले त्यासाठी त्यांना धन्यवाद. अशा शब्दांत मनीषा राणीनं तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध रियॅलिटी शो झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनचा ग्रँड सीझन नुकताच पार पडला.त्याला बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशी हजर होती. यावेळी बिग बॉसच्या १७ व्या सीझनचा विजेता मुनव्वर देखील उपस्थित होता. या सगळ्यात एका व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. मनीषा रानीनं यंदाच्या झलक दिखजा चे विजेतेपद मिळवून आपल्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. बऱ्याच दिवसांपासून झलक दिखला जा ची चर्चा होती. अखेर त्याचा यंदाचा सीझन संपला असून त्यानं चाहत्यांचा निरोप घेतला आहे. या सगळ्यात शेवटच्या एपिसोडमध्ये चर्चा रंगली होती ती हुमा कुरेशी आणि मुनव्वर फारुखीची. त्यानं तिची टिंगल केल्याचे दिसून आले आहे.



# महेंद्रसिंह धोनी लवकरच नव्या भूमिकेत

## एका ओळीच्या फेसबूक पोस्टमुळे चर्चेला उधाण!

नवी दिल्ली ।
।वृत्तसंस्था

**अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या आयपीएलच्या नव्या पर्वाची क्रिकेटप्रेमी आतुरतेने वाट पाहात आहेत. या हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाचे कर्णधारपद भूषवणाऱ्या महेंद्रसिंह धोनीची धडाकेबाज फलंदाजी पुन्हा एकदा पाहायला मिळेल अशी क्रिकेटप्रेमींना आशा आहे. दुसरीकडे महेंद्रसिंह धोनीचे लाखोंनी चाहते असले तरी त्याच्या निवृत्तीबाबत नेहमीच विचारले जाते. असे असतानाच त्याने फेसबूकवर एक पोस्ट केली आहे. त्याच्या या पोस्टमुळे वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलंय.**



महेंद्रसिंह धोनी समाजमाध्यमांवर सक्रीय नसतो. सध्या सगळीकडे आयपीएलची चर्चा आहे. महेंद्रसिंह धोनी आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ज या संघाकडून खेळतो. विशेष म्हणजे त्याच्यावर या संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी असते. आयपीएलच्या या हंगामाला अवघे काही दिवस शिल्लक आहेत. असे असतानाच त्याने फेसबूकवर अवघ्या एका ओळीची पोस्ट टाकली आहे. ‘आयपीएलच्या नव्या हंगामाची मी आतुरतेने वाट पाहतोय. सोबतच मी या हंगामात नव्या भूमिकेत दिसणार असून त्याचीही मला उत्सुकता लागली आहे,’ अशा आशायची पोस्ट धोनीने केली आहे.या पोस्टच्या माध्यामातून धोनीनी आयपीएलच्या या हंगामात काहीतरी वेगळं घडणार असल्याचे संकेत दिलेत. मात्र ही वेगळी बाब नेमकी काय असेल, हे मात्र त्याने स्पष्टपणे संगितलेलं नाही. त्याचे चाहते तसेच क्रिकेटप्रेमी त्याच्या एका ओळीच्या फेसबूक पोस्टचा नेमका अर्थ लावण्याचा प्रयत्न करतायत. या फेसबूक पोस्टच्या निमित्ताने धोनीच्या निवृत्ताचाही मुद्दा आता समोर आला आहे. तो या हंगामादरम्यान क्रिकेटमधून निवृत्ती घेणार का? असा प्रश्न उपस्थित केला जातोय. दरम्यान, ही वेगळी भूमिका काय असेल याचाही खुलासा धोनी लवकरच करणार आहे. त्यामुळे आता आगामी काळात नेमकं काय घडणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलंय.महेंद्रसिंह धोनी हा आयपीएलमध्ये यशस्वी कर्णधार राहिलेला आहे. त्याने चेन्नई सुपर किंग्ज या संघाला एकूण पाच जेतेपदं मिळवून दिलेली आहेत. यंदाच्या हंगामातही तोच कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळेल अशी अपेक्षा आहे. मात्र धोनीने नव्या भूमिकेचा उल्लेख केल्यामुळे त्याच्याकडे कर्णधारपद असेल का? तो निवृत्त होणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित केली जातायत. धोनी जर निवृत्त होणार असेल तर चेन्नईचा नवा कर्णधार कोण? याचीही चर्चा आता रंगली आहे.आयपीएलच्या २०२२ सालच्या हंगामात महेंद्रसिंह धोनीने कर्णधारपद सोडले होते. त्यानंतर चेन्नई संघाची जबाबदारी रवींद्र जाडेजावर सोपवण्यात आली होती. काही सामन्यांत जाडेजाने चेन्नईचे नेतृत्व केले होते. मात्र नंतर त्याने कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला होता. जाडेजाच्या या निर्णयानंतर चेन्नईचे कर्णधारपद पुन्हा एकदा धोनीकडेच आले होते. त्यामुळे धोनी या हंगामात निवृत्त होणार असेल, तर पुन्हा एखदा चेन्नईच्या नेतृत्वाची धुरा जाडेजाकडे सोपवली जाणार का? असेही विचारले जातेय. अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या आयपीएलच्या नव्या पर्वाची क्रिकेटप्रेमी आतुरतेने वाट पाहात आहेत.

### आयपीएल मध्येही दिसणार नाही

» महेंद्रसिंह धोनी समाजमाध्यमांवर सक्रीय नसतो. सध्या सगळीकडे आयपीएलची चर्चा आहे. महेंद्रसिंह धोनी आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ज या संघाकडून खेळतो. विशेष म्हणजे त्याच्यावर या संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी असते. आयपीएलच्या या हंगामाला अवघे काही दिवस शिल्लक आहेत. असे असतानाच त्याने फेसबूकवर अवघ्या एका ओळीची पोस्ट टाकली आहे. ‘आयपीएलच्या नव्या हंगामाची मी आतुरतेने वाट पाहतोय. सोबतच मी या हंगामात नव्या भूमिकेत दिसणार असून त्याचीही मला उत्सुकता लागली आहे,’ अशा आशायची पोस्ट धोनीने केली आहे.या पोस्टच्या माध्यामातून धोनीनी आयपीएलच्या या हंगामात काहीतरी वेगळं घडणार असल्याचे संकेत दिलेत. मात्र ही वेगळी बाब नेमकी काय असेल, हे मात्र त्याने स्पष्टपणे संगितलेलं नाही. त्याचे चाहते तसेच क्रिकेटप्रेमी त्याच्या एका ओळीच्या फेसबूक पोस्टचा नेमका अर्थ लावण्याचा प्रयत्न करतायत. या फेसबूक पोस्टच्या निमित्ताने धोनीच्या निवृत्ताचाही मुद्दा आता समोर आला आहे. तो या हंगामादरम्यान क्रिकेटमधून निवृत्ती घेणार का? असा प्रश्न उपस्थित केला जातोय. दरम्यान, ही वेगळी भूमिका काय असेल याचाही खुलासा धोनी लवकरच करणार आहे.

# शार्दुल ठाकूरचा रणजी ट्रॉफीतील मोठा पराक्रम

## वनडे स्टाइलने झळकावले प्रथम श्रेणी क्रिकेटमधील पहिले शतक

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये रणजी ट्रॉफीचे उपांत्य फेरीचे सामने खेळले जात आहेत. रणजी ट्रॉफी २०२४ च्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात मुंबई आणि तामिळनाडूचे संघ आमनेसामने आहेत. या सामन्यात शार्दुल ठाकूरने मुंबईच्या पहिल्या डावात अप्रतिम कामगिरी केली आहे. त्याने एक असा पराक्रम केला, जो त्याने त्याच्या कारकिर्दीत यापूर्वी कधीही केला नव्हता. शार्दुल ठाकुरने प्रथम श्रेणी क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले आहे.**



अष्टपैलू शार्दुल ठाकूरने रणजी ट्रॉफी २०२४ च्या दुसऱ्या उपांत्य सामन्याच्या पहिल्या डावात शतक झळकावले. शार्दुल ठाकूरने या सामन्याच्या पहिल्या डावात अवघ्या ८९ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. विशेष म्हणजे शार्दुल ठाकूरच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीतील हे पहिले शतक आहे. शार्दुल ठाकूरने या डावात १०५ चेंडूत १०९ धावा केल्या. या दरम्यान त्याच्या बॅटमधून १३ चौकार आणि ४ षटकार पाहिला मिळाले.या सामन्यात तामिळनाडू संघाने पहिल्या डावात केवळ १४६ धावा केल्या होत्या. याला प्रत्युत्तर देताना मुंबई संघाने एकवेळ १०६ धावांवर ७ विकेट गमावल्या होत्या. यानंतर शार्दुल ठाकूर मैदानात आला आणि त्याने संघाचे सामन्यात कमबॅक केले. त्याने हार्दिक तामोरेसह आठव्या विकेटसाठी १०५ धावांची शतकी भागीदारी करत संघाला आघाडी मिळवून दिली. मुंबई संघाने दुसरा दिवस अखेर १०० षटकांत ९ बाद ३५३ धावा केल्या आहेत. सध्या तुषार देशपांडे आणि तुषार कोटियन अनुक्रमे १७ आणि ७४ धावांवर नाबाद आहेत. त्याचबरोबर तामिळाडूकडून साई किशोरने सर्वाधिक ६ विकेट्स घेतल्या. शार्दुल ठाकूरने दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर टीम इंडियासाठी शेवटचा सामना खेळला होता. त्याचबरोबर इंग्लंडविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या कसोटी मालिकेतही त्याला संधी मिळालेली नाही. टीम इंडियातून बाहेर असलेले श्रेयस अय्यर आणि अजिंक्य रहाणे या डावात फ्लॉप ठरले. श्रेयस अय्यरने केवळ ३ धावा केल्या. तर अजिंक्य रहाणे १९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. मात्र, गेल्या सामन्यात द्विशतक झळकावणाऱ्या मुशीर खानने या डावात अर्धशतक झळकावले. त्याने १३१ चेंडूत ५५ धावा करून तो बाद झाला.प्रत्युत्तरादाखल खेळताना मुंबईची अवस्था १०६/७ अशी झाली. पृथ्वी शॉ, भूपेन लालवानी, मुशीर खान, अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर हे सगळे प्रमुख खेळाडू झटपट तंबूत परतले. साई किशोरच्या फिरकीसमोर मुंबईची अवस्था बिकट झाली होती. मात्र यानंतर शार्दूल ठाकूर आणि हार्दिक तामोरे यांनी आठव्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी केली.

### साई किशोरने 6 विकेट्स पटकावल्या

» हार्दिक ३५ धावा करून बाद झाला. शार्दूलला तनुष कोटियनची साथ मिळाली. या जोडीने नवव्या विकेटसाठी ७० धावांची भागीदारी केली. शार्दूल ठाकूरने आव्हानात्मक खेळपट्टीवर तडाखेबंद फलंदाजी करत कारकीर्दीतलं पहिलंवहिलं शतक झळकावलं. शार्दूलने १०९ धावांची खेळी केली. त्याने १३ चौकार आणि ४ षटकारांसह ही खेळी सजवली. शार्दूल बाद झाल्यानंतर तनुष कोटियन आणि तुषार देशपांडे यांनी शेवटच्या विकेटसाठी ८८ धावांची भागीदारी केली. मुंबईने ३७८ धावांची मजल मारली. तामिळनाडूतर्फे साई किशोरने ६ विकेट्स पटकावल्या. मुंबईला २३२ धावांची आघाडी मिळाली.दुसऱ्या डावातही तामिळनाडूच्या फलंदाजांना लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही. बाबा इंद्रजीतने ९ चौकारांसह ७० धावांची एकाकी झुंज दिली.